आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.३५ वाजता
२३ फेब्रुवारी २०२५ रविवार

**ठळक बातम्या**

- अंतराळ क्षेत्र तसंच कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातला युवकांचा वाढता सहभाग नव्या क्रांतीला जन्म देत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं ‘मन की बात’ या कार्यक्रमात प्रतिपादन

- ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची सांगता /प्राथमिक शिक्षणात मराठी भाषेकडे लक्ष दिलं तर मराठी भाषेला उर्जितावस्था येईल, असं संमेलनाध्यक्ष तारा भवाळकर यांचं मत

- जर्मनीत, गुंडेस्टॅग अर्थात संसदेच्या कनिष्ठ सभागृहाच्या निवडणुकीसाठी मतदान

**आणि**

- आयसीसी चँपियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत दुबईत सुरु असलेल्या सामन्यात पाकिस्तानचं भारतापुढं विजयासाठी २४२ धावांचं आव्हान

**<><><><><><>**

अंतराळ क्षेत्र तसंच कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातला भारतीय युवकांचा वाढता सहभाग नव्या क्रांतीला जन्म देत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आकाशवाणीवर ‘मन की बात’ या कार्यक्रमाच्या माध्यमातून आज जनतेशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा ११९वा भाग होता.

**होल्ड मोदी बाईट MKB SPACE YUVA**

गेल्याच महिन्यात इस्रोचं शंभरावं रॉकेट प्रक्षेपण झाल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. ही कामगिरी म्हणजे केवळ आकडेवारी नसून, अंतराळ विज्ञानात नवी शिखरं गाठण्याच्या भारताच्या संकल्पाचे प्रतिबिंब असल्याचं ते म्हणाले. इसरोच्या यशाचा परीघ खूपच मोठा असल्याचं म्हणत इस्रोच्या स्थापनेपासून आत्तापर्यंत गाठलेल्या यशाचा आढावा त्यांनी घेतला. अंतराळ क्षेत्राप्रमाणेच कृत्रिम बुद्धिमत्ता

क्षेत्रातही भारत वेगानं आपली ओळख प्रस्थापित करत असल्याचं ते म्हणाले. या क्षेत्राशी संदर्भात पॅरीस इथं झालेल्या परिषदेत भारताच्या प्रगतीचं जगानं कौतुक केल्याचा अनुभव त्यांनी श्रोत्यांना सांगितला.

येत्या काही दिवसांमध्ये आपण राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करणार असल्याचं स्मरण करून देताना त्यांनी आपल्या मुलांना विज्ञानाची आवड असणं गरजेचं असल्याचं सांगितलं. यादृष्टीनं त्यांनी ‘वैज्ञानिक म्हणून एक दिवस’ ही कल्पना मांडली. नागरिकांनी आपल्या सोयीचा दिवस निवडून त्या दिवशी एक शास्त्रज्ञ, एक वैज्ञानिक म्हणून जगून पाहावं, संशोधन प्रयोगशाळा, तारांगणं किंवा अंतराळ संशोधन केंद्रांना भेट द्यावी, असं आवाहन त्यांनी केलं.

यंदाच्या महिला दिनानिमीत्त ८ मार्च रोजी, एका दिवसासाठी आपण आपल्या समाजमाध्यमांची खाती देशातल्या काही प्रेरणादायी महिलांकडे सोपवणार आहोत. या खात्यांवर त्या त्यांचं काम, त्यांच्या समोरची आव्हानं, अनुभव देशवासियांना सांगतील, असं ते म्हणाले. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी महिलांनी नमो ॲपवर तयार केलेल्या मंचाच्या माध्यमातून सहभागी होण्याचं आवाहन त्यांनी केलं.

आजच्या मन की बातमध्ये प्रधानमंत्र्यांनी उत्तराखंडमध्ये झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतल्या यशवंतांचं अभिनंदन केलं. यावेळी त्यांनी इतर पदक विजेत्यांसह महाराष्ट्रातील किरण म्हात्रे, तेजस शिरसे या खेळाडूंचा उल्लेख केला. खेळांमुळे व्यक्ती आणि समाजासोबतच संपूर्ण राज्याचाही कायापालट होतो असं त्यांनी सांगितलं.

**होल्ड मोदी बाईट MKB SPORTS**

एक तंदुरुस्त आणि निरोगी राष्ट्र बनण्यासाठी भारताला लठ्ठपणाच्या समस्येवरही मात करावी लागेल, असं प्रधानमंत्री म्हणाले. ही समस्या वाढत असल्याची आकडेवारी गंभीर असून, आपण एकत्रितपणे छोट्या -छोट्या प्रयत्नांतून याचा सामना करायला हवा, लठ्ठपणाचा सामना करणं ही वैयक्तिक निवड नाही, तर

कुटुंबाप्रती आपली जबाबदारी आहे, असं ते म्हणाले. याच अनुषंगानं आपल्या आहारातला खाद्य तेलाचा वापर दहा टक्क्यांनी कमी करण्याचं आवाहन त्यांनी श्रोत्यांना केलं. या समस्येचं गांभीर्य आणि त्यावर मात करण्यासाठी ऑलिंपिक पदक विजेता नीरज चोप्रा, क्रीडापटू निखत जरीन तसंच डॉ. देवी शेट्टी यांचे मार्गदर्शनपर संदेशही प्रधानमंत्र्यांनी श्रोत्यांना ऐकवले.

देशातली वैशिष्ट्यपूर्ण जैवविविधता आणि आपल्या स्थानिक संस्कृतीमधलं त्याचं स्थान याबद्दलची माहितीही प्रधानमंत्र्यांनी आजच्या मन की बातमध्ये दिली. महाराष्ट्रात वाघोबाची पूजा करण्याची परंपरा असल्याचा उल्लेख त्यांनी केला आहे. या जैवविविधतेच्या जतन संवर्धन आणि संरक्षणासाठी देशभरातला आदिवासी समाज करत असलेल्या प्रयत्नांचंही त्यांनी कौतुक केलं. यामुळेच देशात वाघ, बिबटे, आशियाई सिंह, गेंडे आणि बारशिंगा अशा प्राण्यांची संख्या झपाट्यानं वाढू लागली असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><><>**

मराठी भाषा वाढायची असेल तर आपल्या घराघरातली मुलं मराठी शिकायला हवीत, असं ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष तारा भवाळकर यांनी म्हटलं आहे.  दिल्ली इथं आयोजित ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या समारोप सोहळ्यात त्या बोलत होत्या. प्राथमिक शिक्षणात मराठी भाषेकडे लक्ष दिलं पाहिजे तर मराठी भाषेला उर्जितावस्था येईल, असं सांगताना मराठी भाषा टिकण्यासाठी आवश्यक असलेले प्रयत्न त्यांनी मांडले….

**होल्ड - बाईट - तारा भवाळकर ( २८ सेकंद)**

इंग्रजी माध्यमांच्या शाळेत परदेशी भाषा ज्या आस्थेनं शिकवल्या जातात तितक्याच आस्थेनं स्वदेशी भाषा शिकवल्या जाव्यात, यासाठी शासनानं कृतिशील व्हावं, असं त्या म्हणाल्या.

सीमा भागातल्या मराठी भाषकांच्या अडचणींकडे त्यांनी लक्ष वेधले. त्याचसोबत महाराष्ट्र आणि कर्नाटक दोघांचाही परस्परांवर असलेला प्रभावही त्यांनी मांडला.

राज्य सरकार सीमा भागातल्या मराठी भाषकांच्या पाठीशी खंबीरपणे उभं असून त्यांना न्याय मिळवून दिला जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी समारोप सत्रात दिली. मराठी भाषेच्या प्रचार प्रसारासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, अशी ग्वाहीदेखील  पवार यांनी दिली. इतर शिक्षण मंडळाच्या शाळेत शिकणाऱ्या मुलांना मराठी वाचता यावं, यासाठी प्रयत्न केले जातील. दिल्लीत राहणाऱ्या मराठी माणसांना बोलता भेटता यावं यासाठी स्थान निर्माण केलं जाईल, त्यासाठी अर्थसंकल्पात घोषणा केली जाईल, असं पवार यांनी सांगितलं. तुळापूर आणि वढू इथं छत्रपती संभाजी महाराजांचं दिमाखदार स्मारक व्हावं यासाठी सरकार काम करत असल्याचं सांगत पवार यांनी शंभूराजांच्या साहित्यप्रेमाचं आणि साहित्यकृतीचा गौरवपूर्ण उल्लेख केला..

महाराष्ट्रभूमीसाठी सदैव झटत राहू, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.  तालकटोरा स्टेडियमच्या जागेला  असलेल्या ऐतिहासिक वारशाचा उल्लेख करून  मराठी सारस्वतांनी आज आपल्या विचारांनी दिल्ली जिंकली असल्याचं,शिंदे म्हणाले. सरहद संस्थेनं काश्मीर खोऱ्यात केलेल्या कार्याचं कौतुक त्यांनी यावेळी केलं. राजकारणापलीकडची नाती जपणं, ही महाराष्ट्राची संस्कृती आहे, असं ते म्हणाले.

दिल्लीतल्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठात  कुसुमाग्रज अध्यासन केंद्र लवकरच होईल, असं मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

जर्मनीत, गुंडेस्टॅग अर्थात संसदेच्या कनिष्ठ सभागृहाच्या निवडणुकीसाठी आज मतदान सुरु आहे. सोशल डेमोक्रॅटिक पार्टीचं आघाडी सरकार

कोसळल्यामुळे नवं सरकार आणण्यासाठी सुमारे ५ कोटी ९० लाख मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. २९९ मतदारसंघांमधे ४ हजार ५०६ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. ख्रिश्चन डेमोक्रॅटिक युनियन, ख्रिश्चन सोशल युनियन, ओलाफ स्कोल्झ यांची सोशल डेमोक्रॅटिक पार्टी आणि अलटरनेटिव्ह फॉर जर्मनी या चार प्रमुख पक्षांमधे ही लढत होत आहे.

**<><><><><><>**

आयसीसी चँपियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज दुबईत सुरु असलेल्या सामन्यात पाकिस्ताननं भारतापुढं विजयासाठी २४२ धावांचं आव्हान ठेवलं आहे.

पाकिस्ताननं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला. सोद शकीलनं सर्वाधिक ६२ धावा, तर कर्णधार महंमद रिझवाननं ४६ धावा केल्या. खुशदिल शाहानं ३८ धावांच योगदान दिलं. भारतातर्फे कुलदीप यादवनं ३, तर हार्दिक पंडयानं २ गडी बाद केले.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या  २७ षटकात  २ बाद १३६ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><><>//**